४

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा//१८/१०८
पुणे १ दिनांक :- 28/05/2018

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**इडन एज्युकेशन सोसायटी ५ लॅडमाक कन्डोमिनियस औध रोड पुणे संचालित**
**इंडेन इंटरनॅशनल स्कू.ल मौजे कातवी एमआयडी रोड तळेगाव दाभाडे ता मावळ जिल्हा पुणे**

विषयः- सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १, ६ व २४) २०१२.
२) शासन निर्णय एसएफएस १०१७ प क ८०६/ एसएम २ दिनांक १४/११/२०१७

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने कायम विना अनुदानिनत तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या नाहरकत प्रमाणपत्रानुसार नविन शाळा **स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नोव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **इडन एज्युकेशन सोसायटी ५ लॅडमाक कन्डोमिनियस औध रोड पुण** | **इंडेन इंटरनॅशनल स्कू.ल मौजे कातवी एमआयडी रोड तळेगाव दाभाडे ता मावळ** | इंग्रजी | नवीन शाळा | इ. १ ली ते ८ वी | |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२ शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३ या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४ संदर्भ क्रमांक ०२ अन्वयेसन २००९-१०मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५ परवानगी मिळाल्या पासून ।अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६ परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७ शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीनशाळा / वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांनाUDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
१० शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

28/05/18

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**१.मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**३.मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**४ मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१**
**५गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मावळ .**

परवानगी वर्ष :- **२०१६-२०१७**
माध्यम : **इंग्रजी**
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक /सीआयसीएसई)

जा.क.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा./पुवि/२०१९ 12680
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 2 APR 2019

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :-** महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत इंग्रजी माध्यम , दर्जावाढ **इ.९ वी चे सीआयसीएसई चे वर्गास** प्रथम मान्यता जून- २०१९ पासून देणेबाबत
**इडन एज्युकेशन सोसायटी, ५ लॅन्डमार्क कन्डोमीनियमस,औंध रोड, पुणे संचलित इडेन इंटरनॅशनल स्कुल,मोजे कातवी एमआयडीसी रोड तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे**

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२
२. शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र. जा.क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र. १६९/एसएम-२, दिनांक ६.५.२०१७
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/माध्य-२/स्वयंशाळा मान्यता/पुवि/२०१६/५६६४ दिनांक १६.८.२०१७
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचे पत्र क्र.जि.प शिक्षण /माध्य/सांक्र/१९६३, दिनांक ३०.३.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **इडन एज्युकेशन सोसायटी, ५ लॅन्डमार्क कन्डोमीनियमस,औंध रोड, पुणे संचलित इडेन इंटरनॅशनल स्कुल,मोजे कातवी एमआयडीसी रोड तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे** या इंग्रजी माध्यम **सीआयसीएसई** माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी सर्व शाखा नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१६-२०१७ पासून देण्यात आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा,नवीन शाळा इंग्रजी माध्यम **सीआयसीएसई** शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१६-२०१७ पासून दिलेली आहे. आता आपल्या संदर्भीय पत्र क्र. ४ व्दारे दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात घेता **इ.९ वी, जून-२०१९ इंग्रजी माध्यम वर्गास नवीन शाळा सीआयसीएसई ,स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२.नविन वर्गांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३ माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे
४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५.संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१० संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१६-२०१७** पासून असेल
१३.शैक्षणिक वर्ष **२०१६-२०१७** मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

पुणे जिल्हा परिषद

# माध्यमिक शिक्षण विभाग

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

जाक्र.पुजिप/उच्च.माध्य/२०२०/ 2074

दिनांक:- 25/6/२०२०

परवानगी वर्ष-२०१६-१७
परवानगी प्रकार- दर्जावाढ

शाळा सुरु वर्ष-२०१७-१८

**स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

प्रति,

१.अध्यक्ष/सचिव, ईडन एज्युकेशन सोसायटी ५ लॅडमार्क कन्डोमीनियमस औंध रोड पुणे.
२.मुख्याध्यापक/प्राचार्य, ईडन इंटरनॅशनल स्कूल, मौजे कातवी ,एमआयडीसी रोड, तळेगांव दाभाडे, ता.मावळ , जि.पुणे.

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.** (इयत्ता- १० वी)

संदर्भ :- १.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२.
२.शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.१४२/एस.एम-२ दि.१४ जुलै,२०१७
३.शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र जाक्र.उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०
४.शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१७/प्र.क्र.१६९/एस.एम-२ दि.०६/०५/२०१७
५.संबंधित शाळेकडील प्रस्ताव क्र.००३/२०१९-२० दिनांक-०९/१२/२०१९

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग (इयत्ता व शाखा) | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि.दिनांक- ०६/०५/२०१७ | ईडन एज्युकेशन सोसायटी ५ लॅडमार्क कन्डोमीनियमस औंध रोड पुणे. | ईडन इंटरनॅशनल स्कूल, कातवी ,एमआयडीसी रोड, तळेगांव दाभाडे, ता.मावळ , जि.पुणे. | इंग्रजी | ICSE | इ.१० वी च्या वर्गास नैसर्गिक दर्जावाढ मिळणे | २०१७-१८ ते २०२१-२२ | पाच वर्षांसाठी |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.
४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.
५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेद्वारावर लावणे आवश्यक राहील.
६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गांव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.
७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डीक्र.dydpune @ gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com


प्रथम मान्यता (खाते मान्यता)

माध्यम : इंग्रजी/मराठी

स्वंयअर्थ सहाय्यित शाळा

जा.क.शिउसं/उमाशि-५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२१ /9000L

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- 24 DEC 2021

प्रति

प्राचार्य

ब्लुमिंगडेल इंटरनॅशनल स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नारायणगाव, ता-जुन्नर, जि-पुणे

**विषय - सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी विभागाची खाते मान्यता देण्याबाबत....**

**संदर्भ -** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१७/प्र.क्र.१६९/एसएम-२ दि. ०६.०५.२०१७

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि प पुणे यांचेकडील पत्र क्र.पुजिप/उच्च.माध्य/२०२१/७२३० दि. २६.१०.२०२१

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत **इडन एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे** या संस्थेच्या नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. पुणे** यांच्याकडील प्रस्तावानुसार आपल्या **इडन इंटरनॅशनल स्कूल, मौजे-कातवी, एमआयडीसी रोड, तळेगांव दाभाडे, ता-मावळ,** जि-पुणे या शाळेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विभागाची मान्यता **(खाते मान्यता)** देण्यात येत आहे.

| शासन निर्णय क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | इडन एज्युकेशन सोसायटी, औंध, पुणे | इडन इंटरनॅशनल स्कूल, मौजे-कातवी, एमआयडीसी रोड, तळेगांव दाभाडे, ता-मावळ, जि-पुणे | इंग्रजी | नवीन शाळा आयसीएसई | इ. ११ वी प्रथम कला व विज्ञान | २०२१-२२ |

**अटी व शर्ती :-**

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासना निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.

२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी

३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी

४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी

५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत

६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही

७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल

८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून असेल.

९ शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,पुणे

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-४११००१

ई-मेल-dydpune@gmail.com वेबसाईट-www.dydepune.com फोन.२०-२६१२ ५६१६/२२१७

जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०५/927ee

दिनांक- 28 NOV 2022

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,

एडन इंटरनॅशनल स्कल मौजे कातवी तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

विषय- इयत्ता-१२ वी वर्गास नैसर्गिक वाढीने स्वयंअर्थसहायित तत्त्वावार मान्यता देणेबाबत.
(नवीन शाळा - मूळ वर्ग)

संदर्भ- १.शासन निर्णय क्र.उमातु-२०१७/ प्रक्र.१६९/एसएम-२ दि.०६/०५/२०१७
२.या कार्यालयाचे पत्र जाक्र./उमाशि-५/पुवि/मान्यता १०००८/ दि.२४/१२/२०२१
३. शिक्षणाधिकारी (माध्य) जि प पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र./पुजिप/उच्च.माध्य/नै.वाढ/२०२२/९६१० दि.१६/११/२०२२

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते, संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनिमन) अधिनियम २०१२ अंतर्गत,आपले विद्यालयास खाली नमूद केलेनुसार उच्च माध्यमिक वर्ग/शाखा/तुकडया स्वयंअर्थसहायित तत्त्वावार मंजूर करणेत आलेल्या आहेत. संदर्भ क्र.२ अन्वये इ.१२ वी वर्गास नैसर्गिक वाढीने मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव तपासून सादर करण्यात आलेला होता.

**याव्दारे खालील नमूद इ.१२ वी वर्गांना नैसर्गिक वाढीने स्वयंअर्थसहायित तत्त्वावर मान्यत प्रदान करण्यात येत आहे.**

| संस्थेचे नाव | उच्च माध्यमिक शाळेचे नाव | मंजुर वर्ग | माध्यम | प्रकार | मंजुरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| इडन एज्युकेशन सोसायटी | एडन इंटरनॅशनल स्कल मौजे कातवी तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इ.१२वी विज्ञान — प्रथम | इंग्रजी | स्वयं अर्थसहायित तत्वावर | २०२२-२३ |

**टीप-** मूळ परवानगी देण्यात आलेला शासन निर्णय, अतिरिक्त शाखा/ जादा तुकडी मंजूरी आदेशामध्ये नमूद अटी व शर्ती तसे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहितीस्वत**

१.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर पुणे-५

२.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे/ अहमदनगर/ सोलापूर